नि.दि.दावा क्र.२०१/२०२२
दिपक वि. भिकन व इतर.
CNR No.MHJN090009232022

## नि.क्र.१४ वरील आदेश

१. वादीतर्फे प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ व आदेश १ नियम १० सह कलम १५१ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी व पक्षकारांना सामील करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन की, दावा हा एकत्र हिंदू कुटूंबाच्या मिळकतींच्या वाटपाकरीता व स्वतंत्र कब्जाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी या कामी हजर होऊन त्यांचे म्हणणे दाखल करुन आवश्यक पक्षकारांची तक्रार उपस्थित केलेली आहे. दावा अद्याप चौकशीला लागलेला नाही व तो सद्यस्थितीत प्रतिवादींच्या हजेरीकरीता प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र.१ च्या मुलींना केवळ नजरचुकीने दावेकामी पक्षकार करण्याचे राहून गेलेले आहे. दावेकामी निर्माण होणारी तांत्रिक अडचण दूर करण्याकरीता व न्यायाचे हेतुस्तव वादी हे प्रतिवादी क्र.१ यांच्या मुली सुनिता रविंद्र देशमुख, वय वर्षे ५०, धंदा – घरकाम, रा.साखळी खुर्द, ता.जि.बुलढाणा हिला प्रतिवादी क्र.११ म्हणून व लताबाई भाऊसाहेब औटे, वय ४८ वर्षे, धंदा – घरकाम, रा.गल्ली क्र.१, भाग्यनगर, गारखेडा, औरंगाबाद हिला प्रतिवादी क्र.१२ म्हणून दावेकामी पक्षकार म्हणून समाविष्ट करु इच्छित आहे.

३. याशिवाय, वादीने दावा अर्ज कलम २ मधील दावा या शब्दानंतर ''*प्रतिवादी क्र.११ व १२ या प्रतिवादी क्र.१ यांच्या मुली असून त्यांनी त्यांचा हक्क व हिस्सा वादी तसेच प्रतिवादी क्र.१० यांच्या लाभात सोडून दिलेला आहे*'' असा मजकूर नमूद करण्याची परवानगी मागितलेली आहे.

४. याशिवाय, दावा मिळकतीच्या परिशिष्ट ई मध्ये ''एफ'' नावाचा नवीन रकाना तयार करुन त्यापुढे ''गट क्र.३६८ पूर्ण क्षेत्रफळ ०.०६ आर पैकी ०.०१.५ आर म्हणजेच अर्धा गुंठा त्यामध्ये असलेली विहीर व पाण्याच्या हक्कासह' 'असा मजकूर नमूद करण्याची परवानगी मागितली आहे.

५. याशिवाय, दावा अर्ज कलम ५ मधील ओळ क्रमांक ८ च्या शेवटी गट क्र.२७५ हा चुकीचा नमूद केल्याचे कथन करुन गट क्र.२७५ ऐवजी मौजे मानदेऊळगाव, ता.बदनापूर येथील गट क्र.३७० नमूद करावा अशी परवानगी वादीने मागितलेली आहे.

६. वादी असेही कथन करतो की, वादीने मागितलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. दाव्याची चौकशी अद्याप सुरु झालेली नाही. वरील सर्व तक्रारी प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये उपस्थित केल्या असल्यामुळे वादींना दावा दुरुस्त करण्याची परवानगी दिल्यास प्रतिवादींवर कोणताही अन्याय होणार नाही. सदरची दुरुस्ती ही वादी व प्रतिवादींचे हक्क निर्णित करण्याकरीता व भविष्यकालीन दाव्यांची पुनरावृत्ती

टाळण्याकरीता महत्वाची आहे. वादींचा अर्ज नामंजूर केल्यास वादींच्या हक्कांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, वादीला दावा अर्ज कलम ३, ४, ५ व ६ मध्ये वरीलप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी, अशी वादीने विनंती केलेली आहे.

७. प्रतिवादी यांनी नि.क्र.१९ कडे स्वतःचे म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज नाकारला आहे. वादीचा दुरुस्ती अर्ज खर्चासहीत मंजूर व्हावा असे प्रतिवादींनी कथन केले आहे. याशिवाय, वाद मिळकतीच्या भागीदारास पक्षकार न केल्याचे कारण वादीने दाव्यात नमूद केले नाही. त्यामुळे, वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी मागणी प्रतिवादींनी केलेली आहे.

८. अर्ज व अर्जाला आलेले म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विव्दान वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

९. प्रतिवादींनी या कामी त्यांची कैफियत दाखल केल्यानंतर ज्या तक्रारी उपस्थित केल्या त्या सर्व तक्रारींबाबत वादीने दावेकामी दुरुस्ती मागितली असल्याचे दिसून येते. दावेकामी अद्याप काही प्रतिवादीं हे हजर होणार असून त्यांचीही कैफियत दावेकामी येणे बाकी आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांची कैफियत दाखल करुन आवश्यक पक्षकाराची व आवश्यक दावा मिळकती दावेकामी समाविष्ट करण्याची तक्रार उपस्थित केली. त्यास अनुसरुन वादीने दावेकामी दुरुस्ती मागितलेली आहे. दावा वाटपाचा व तुटक कब्जाचा आहे.

दावेकामी वादी व प्रतिवादींचे दावा मिळकती संदर्भात समसमान अधिकार आहेत. त्यामुळे, वादीस दावा दुरुस्त करण्याची परवानगी दिल्याने प्रतिवादींनी उपस्थित केलेल्या सर्व तक्रारी दूर होवून दाव्यातील वादविषयाची गुणावगुणावर चौकशी करणे न्यायालयास मदत होणार आहे व त्यामुळे भविष्यातील वादांची पुनरावृत्तीही टळणार आहे.

१०. वादीला दावा दुरुस्त करण्याची संधी न दिल्यास समाविष्ट न केलेल्या पक्षकारांबाबत व वाद मिळकतीबाबत भविष्यकालीन वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादीच्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात व मागितलेल्या दादींमध्ये आमुलाग्र बदल होईल असेही दिसून येत नाही. सदरची दुरुस्ती ही चौकशी पूर्व दुरुस्ती असून त्याकरीता वादीस खर्च लावणेही न्यायोचित होणार नाही. सबब, वरील सर्व कारणास अनुसरुन वादीचा अर्ज हा आहे त्या स्थितीत मंजूर होणेस प्राप्त आहे. त्यामुळे, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वादीने अर्जकामी मागितलेली सर्व दुरुस्ती ही आदेश झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत करुन दुरुस्त दाव्याची प्रत दावेकामी दाखल करणेची आहे.

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2023.10.05 11:37:32 +0530

दि.१६.०९.२०२३. (श्रीमती.यु.पी.कोळी)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बदनापूर.